# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 07 January 2026

## Time 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक ०६ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.

****

- महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराला वेग, मतदान जागृतीसाठी प्रशासनाकडून विविध उपक्रमांचं आयोजन
- ऑनलाइन परकीय चलन आणि सोन्याचा व्यवहार करणाऱ्यांची फसवणूक करणाऱ्या आंतरराष्ट्रीय टोळीचा मुंबई पोलिसांकडून पर्दाफाश
- अग्निवीरांना विविध क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारकडून अभ्यासगटाची स्थापना

आणि

- राज्यभरात दर्पणदिन साजरा, मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रचाराने वेग घेतला आहे. निवडणुकीसाठी प्रशासनाचीही तयारी सुरू आहे. मतदारांमध्ये मतदानविषयक जागृती करण्यासाठी विविध उपक्रम राबवण्यात येत असून, मतदान आणि मतमोजणीसाठी कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षणवर्ग सुरू आहेत.

जळगाव इथं निवडणुकीसाठी मतदान केंद्राध्यक्ष आणि मतदान अधिकाऱ्यांच्या प्रशिक्षणाचा पहिला टप्पा पार पडला. या प्रशिक्षणाला उपस्थित न राहिलेल्या ९९ कर्मचाऱ्यांविरुद्ध निलंबनासह गुन्हे दाखल करण्याचा इशारा आयुक्त ज्ञानेश्वर ढेरे यांनी दिला आहे.

**

मतदारांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी लातूर शहरात काल ‘वॉकेथॉन’ फेरी काढण्यात आली. लातूर शहर महानगरपालिका आणि रोटरी क्लब यांच्यातर्फे संयुक्तपणे घेतलेल्या या फेरीत, जनजागृतीपर फलक आणि घोषणांचा वापर करण्यात आला. महानगरपालिकेच्या अधिकारी कर्मचाऱ्यांसह नागरिकांनीही या फेरीत मोठ्या संख्येनं सहभागी होत, ‘मतदान हा आपला हक्क’ असल्याचा संदेश दिला.

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरातल्या संवेदनशील भागांसह विविध परिसरात पोलीस विभागाचं पथसंचलन केलं जात आहे. सर्वच पक्षांचे स्थानिक नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते जोमाने प्रचाराला लागले आहेत. पदफेऱ्या, दुचाकी फेरी, कॉर्नर बैठका, आदी पद्धतीने सकाळपासूनच प्रचार सुरू होत असल्याने आता प्रचाराला रंगत आलेली दिसून येत आहे.

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने छत्रपती संभाजीनगच्या विकासाचा आपला जाहीरनामा काल प्रसिद्ध केला.

**

मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काँग्रेसनं काल ‘मिशन मुंबई’ हा जाहीरनामा प्रसिद्ध केला. नागपूर महापालिकेसाठीचाही काँग्रेसचा जाहीरनामा प्रसिद्ध झाला. स्वच्छ, सुरक्षित आणि स्मार्ट नागपूर घडवण्याचा ठाम संकल्प, २० सूत्रांच्या या जनहितकारी आराखड्यात आहे, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिली.

तर भाजपनं ठाणे महानगरपालिका निवडणुकीसाठीचा ‘ठाणे निर्धारनामा’ हा जाहीरनामा काल प्रसिद्ध केला.

**

लातूर इथं निवडणूक प्रचारादरम्यान माजी मुख्यमंत्री दिवंगत विलासराव देशमुख यांच्याबद्दल केलेल्या वक्तव्याबद्दल भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी काल दिलगिरी व्यक्त केली. आपलं हे वक्तव्य अराजकीय असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

चव्हाण यांच्या या वक्तव्याविरोधात विविध संघटनांच्या वतीने आज लातूरमध्ये बंदचं आवाहन केलं आहे.

दरम्यान, महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचारासाठी मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस आज लातूरमध्ये येत आहेत. टाऊन हॉल इथं त्यांची जाहीर सभा होणार आहे.

**

एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी काल लातूरमध्ये महायुतीतल्या घटक पक्षांवर टीका केली. भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मुंबईत एकत्र बसतात, मात्र लातूर महानगरपालिका निवडणुकीत ते स्वतंत्रपणे लढवण्याचं नाटक करत आहेत, असा आरोप त्यांनी केला.

****

सी आर एस अर्थात नागरी नोंदणी प्रणालीच्या सॉफ्टवेअरमध्ये अनियमितता आढळल्याप्रकरणी राज्य सरकारनं एका विशेष तपास पथकाची नियुक्ती केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या शेंदूरसनी, या तेराशे लोकसंख्या असलेल्या गावात जन्म आणि मृत्यूच्या २७ हजार नोंदी आढळल्याचं प्रकरण उघडकीस आलं आहे, या प्रकरणी हे पथक या आठवड्यात शेंदूरसनी इथं भेट देऊन नोंदणी प्रणालीत काय चूक झाली याचा शोध घेणार आहे. याप्रकरणी फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला असून, यवतमाळ पोलीस अधिक तपास करत आहेत.

****

ऑनलाइन परकीय चलन आणि सोन्याचा व्यवहार करणाऱ्या योजनांमध्ये शेकडो लोकांची २०० कोटी रुपयांपेक्षा अधिक फसवणूक करणाऱ्या एका आंतरराष्ट्रीय टोळीचा मुंबई पोलिसांनी पर्दाफाश केला. विविध राज्यांमधल्या ५० पेक्षा जास्त प्रकरणांशी संबंधित असलेल्या या टोळीतल्या सात जणांना पोलिसांनी अटक केली. मीरा भाईंदर-वसई विरारचे पोलिस आयुक्त निकेत कौशिक यांनी काल वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. फसवणूक करणाऱ्यांनी विवाह जुळवणाऱ्या वेबसाइट्स आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मद्वारे विश्वास निर्माण करून अनेकांची फसवणूक केल्याचं उघडकीस आलं असून, या टोळीचे सूत्रधार देशाबाहेरून हा कारभार चालवत असल्याचा पोलिसांना संशय आहे.

****

अग्निवीरांना शासकीय, निमशासकीय किंवा खासगी क्षेत्रात संधी मिळवून देणं किंवा स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उपाययोजना सुचवण्यासाठी राज्य सरकारने एक अभ्यासगट स्थापन केला आहे. सैनिक कल्याण विभागाचे संचालक निवृत्त कर्नल दीपक ठोंगे हे या गटाचे अध्यक्ष असून, निवृत्त लेफ्टनंट कमांडर ओंकार कापले सदस्य सचिव आहेत. नौदल, हवाई दल आणि पायदळातल्या सात निवृत्त वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश असलेल्या या अभ्यासगटाला उपाययोजना सुचवण्यासाठी तीन महिन्यांचा कालावधी सरकारनं दिला आहे.

****

राज्यभरात दर्पणदिन काल साजरा झाला. मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी दर्पण हे वृत्तपत्र सुरू केल्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

**

छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हा माहिती कार्यालयाच्या समिती सभागृहात आचार्य जांभेकरांना अभिवादन करण्यात आलं. प्रभारी उपसंचालक प्रशांत दैठणकर यांच्या हस्ते त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

**

धाराशिव जिल्हा पत्रकार संघानेही जांभेकर यांना आदरांजली अर्पण केली. संघाचे अध्यक्ष देविदास पाठक यांनी जांभेकर यांच्या पत्रकारितेतील अनेक पैलूंवर प्रकाश टाकत, पत्रकारितेच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केलं.

****

मंत्रालय आणि विधिमंडळ वार्ताहर संघाचे या वर्षीचे उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार काल जाहीर झाले. 'कृ. पां. सामक' हा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर यांना जाहीर झाला आहे. राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी 'लोकसत्ता' चे प्रतिनिधी अशोक अडसूळ यांची, तर वृत्तवाहिनीसाठी राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारासाठी, 'इंडिया टुडे–आज तक' ग्रुपचे पुणे ब्युरो चीफ ओमकार वाबळे यांची निवड करण्यात आली आहे. वार्ताहर संघाच्या सदस्यांसाठी असलेला उत्कृष्ट पुरस्कार 'ॲग्रोवन'चे बाळासाहेब पाटील यांना जाहीर झाला आहे. लवकरच या पुरस्कारांचं वितरण करण्यात येणार आहे.

****

माजी केंद्रीय मंत्री सुरेश कलमाडी यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात अत्यंसंस्कार करण्यात आले. कलमाडी यांचं काल पहाटे पुण्यात निधन झालं. ते ८२ वर्षांचे होते. यांच्या निधनाबद्दल राजकीय वर्तुळातून दुःख व्यक्त केलं जात आहे.

****

केंद्र सरकारने नुकतंच विकसित भारत रोजगार आणि उपजिविका हमी ग्रामीण – व्हीबी जी राम जी हे विधेयक संमत केलं. या योजनेत विविध २६५ कामांचा समावेश केल्याची माहिती, हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्यातल्या गिरगाव इथले सरपंच प्रमोद नारदे यांनी दिली. ते म्हणाले...

**बाईट – प्रमोद नारदे**

****

राज्यात इयत्ता चौथी आणि सातवीची शिष्यवृत्ती परीक्षा येत्या १६ एप्रिल रोजी सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार आहे. या परीक्षेची अधिसूचना महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली असल्याची माहिती परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी दिली. या परिक्षेसाठी विद्यार्थ्यांना दोन फेब्रुवारीपर्यंत ऑनलाईन अर्ज दाखल करता येणार आहे.

****

राष्ट्रीय नैसर्गिक शेती अभियानाअंतर्गत छत्रपती संभाजीनगर इथं कन्नड, खुलताबाद, गंगापूर आणि वैजापूर तालुक्यातल्या कृषी सखींसाठी प्रशिक्षण शिबीर घेण्यात आलं. एमजीएम कृषी विज्ञान केंद्र आणि कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा- आत्मा यांच्यावतीनं घेतलेल्या या शिबीरात नैसर्गिक शेतीबद्दल मार्गदर्शन करण्यात आलं.

****

संक्रांत सणाच्या दिवसांत पतंग उडवतांना विद्युत यंत्रणेपासून सुरक्षित अंतर राखावं, असं आवाहन महावितरणनं एका पत्रकातून केलं आहे. पतंगप्रेमींनी मोकळ्या मैदानात पतंग उडवावा, तसंच, विद्युत वाहिन्या किंवा खांबांवर अडकलेले पतंग आणि मांजा काढण्याचा प्रयत्न करू नये, असंही या पत्रकात म्हटलं आहे.

****

भारताची स्क्वॉशपटू अनाहत सिंग हिनं पहिल्यांदाच ब्रिटिश कनिष्ठ खुल्या स्क्वॉश अजिंक्यपद स्पर्धेत १९ वर्षांखालच्या गटात अंतिम फेरीत धडक मारली आहे. उपांत्य फेरीत तिनं इजिप्तच्या मलिका एल कारास्की हिच्यावर ११-८, ११-७, ११-९ अशी मात केली. आता अनाहतचा सामना युरोपीय अजिंक्यपद विजेती फ्रान्सची लॉरेन बाल्टयान हिच्याशी होणार आहे.

****

राज्यात काल गोंदिया जिल्ह्यात सर्वात कमी सात अंश तर नागपुरात साडे सात अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. जळगाव साडे दहा, अहिल्यानगर साडे अकरा, तर नाशिक जिल्ह्यात मालेगाव इथं १२ पूर्णांक दोन दशांश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर तसंच परभणी इथं सुमारे साडे १३ अंश तर नांदेड इथं साडे १२ अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****